श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहिल्यानगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ ६२७०/२०२५
दिनांक- 7 MAR 2025

7 MAR 2025

प्रति,
मे.------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

**विषय:- संस्थानचे मंदिर विभागासाठी व्दारकामाईतील धुनीसाठी रानशेणी गोवरी व थापील गोवरी खरेदी..**

**दरपत्रक मागणी**

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे रानशेणी गोवरी व थापील गोवरी दरपत्रकाव्दारे खरेदीकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर खरेदीसाठी खालीलप्रमाणेअटी/शर्ती राहतील.

अटी/शर्ती –

१. सदर पत्रासोबत दर भरणेसाठी फॉर्म जोडला आहे. त्यामध्ये दर भरुन खाली आपला शिक्का मारुन त्यावर स्वाक्षरी करावी व हा फॉर्म सीलबंद पाकीटात सादर करावा. तसेच दरपत्रकासोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला/आधारकार्ड/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना, पॅन कार्ड यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. सदर मागणी केलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे देऊ नये त्यांचा विचार केला जाणार नाही.

२. पुरवठा करावयाचे रानशेणी गोवरी व थापील गोवरीची मागणी व वर्णन परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच दरपत्रक भरावे.मागणी केलेल्या रानशेणी व थापील गोवरीचेच दर भरावेत.

३. रानशेणी व थापील गोवरीचे दर भरतांना GST, GST-TDS, सर्व प्रकारचे शासकीय कर,पॅकिंग व फॉरवडींग, वाराई, हमाली खर्च तसेच संस्थानचे मंदिर / भांडार विभागात पोहोचचे खर्च, हे सर्व खर्च विचारात घेऊन दर नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

४. आपले दरपत्रक मंजूर झालेस,विहीत मुदतीत रानशेणी व थापील गोवरी पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम रानशेणी गोवरीचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर व पुरवठादारसची मागणी प्राप्त झालेनंतर परत केली जाईल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

५. दरपत्रक मंजूर झालेवर रू.५००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी आपणास आदा करावी लागेल.

६. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठाकालावधीत अगर त्यानंतरही संस्थानचे गरजेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा रानशेणी व थापील गोवरीची मागणी संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेले परिमाणाइतकी सर्व रानशेणी व थापील गोवरी खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.



Scanned with OKEN Scanner

७. परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे रानशेणी व थापील गोवरीचे दरपत्रक सादर करावे व त्याप्रमाणेच माल पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. पुरवठा आदेशाप्रमाणे माल नसल्यास तो स्वीकारला जाणार नाही. तो तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास त्याची नासधुस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

८. शिर्डी संस्थान हे धर्मदाय ट्रस्ट असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

९. सिलबंद पाकिटातील दरपत्रक शिर्डी येथे संस्थानच्या आवक विभागातविहीत वेळेत पोहचणे आवश्यक आहे. दरपत्रक देतांना "रानशेणी व थापील गोवरी पुरविणेचे दरपत्रक- (खरेदी विभाग)" असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख असावा.

१०. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक नाही.

११. सदर रानशेणी च थापील गोवरीचा पुरवठा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून एक वर्ष राहील. आवश्यकतेप्रमाणे गोवरीची मागणी संस्थानचे मंदिर विभागाकडून केली जाईल. त्याप्रमाणे १ वर्षाकरीता गोवरीचा पुरवठा करावा लागेल.

१२. रानशेणी व थापील गोवरीचा पुरवठा दुरध्वनी/ईमेलव्दारे कळविलेनुसार दिलेले शेड्यूलप्रमाणे वेळेत करावा लागेल.

१३. आपण पुरविलेली रानशेणी व थापील गोवरी संस्थानने नाकारली व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून रानशेणी व थापील गोवरी खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातूनही वसूल केली जाईल.

१४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

१५. पुरवठा आदेशातील रानशेणी व थापील गोवरी विहीत मागणी केलेल्या मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या गोवरीची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या गोवरीची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

१६. रानशेणी व थापील गोवरीची मागणी ई-मेल / दूरध्वनीवरुन कळविल्यानुसार वेळेत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितकी किंवा दिलेल्या आदेशा इतकी रानशेणी व थापील गोवरी दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या रानशेणी व थापील गोवरीसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या रानशेणी व थापील गोवरीच्या बिलातून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१७. दरपत्रकातील मागणी/ वर्णनाप्रमाणे व मंजूर दराने रानशेणी व थापील गोवरीचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने रानशेणी व थापील गोवरी पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा रानशेणी व थापील गोवरी पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेर निविदा मागणी करुन रानशेणी व थापील गोवरी खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल करण्याबाबत संस्थानने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.



Scanned with OKEN Scanner

१८. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक रानशेणी व थापील गोवरीचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१९. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून ६० दिवसांचा राहील.

२०. पुरविलेल्या रानशेणी व थापील गोवरीचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच बील आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२१. बील संस्थानकडे सादर केलेपासून मंदिर विभागाचा अभिप्राय प्राप्त झालेनंतर साधारणत: ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापी तांत्रिक कारणांमुळे बील आदा करण्यास विलंब झाला तरीही पुरवठा थांबविता येणार नाही.

२२. पुरवठादाराने रानशेणी व थापील गोवरीचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

२३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

२४. सदरचे दरपत्रक फॉर्म downloading साठी संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in वर उपलब्ध असुन. अंतिम दि. 15 / 03 /२०२५ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व विहीत मुदतीत संस्थानला सीलबंद पाकीटात सदरचे दरपत्रक मिळेल अशा पध्दतीने सादर करावेत.उशिरा आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२५. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थानने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



Scanned with OKEN Scanner

मंदिर विभागाचे व्दारकामाईतील धुनीसाठी खरेदी करावयाच्या गोवरीचा तपशिल

सन -2024-26

| अ.न. | तपशिल | मागणी | दर प्रती किलो (सर्व कर व खर्चासह) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | रानशेणी गोवरी (वाळलेली) | १,००,००० किलो | | |
| २ | थापील गोवरी (वाळलेली) | २५,००० किलो | | |

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned with OKEN Scanner